श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित

# यशवंत महाविद्यालय नांदेड

## मराठी विभाग आयोजित

## बी. ए. प्रथम पदवी उद्‌बोधन वर्ग- 2025-2026

यशवंत महाविद्यालय नांदेड येथील मराठी विभागाच्या वतीने दिनांक 26/ 7 /2025 रोजी मा. प्राचार्य सरांच्या सूचनेनुसार बी. ए. प्रथम बी.कॉम प्रथम बी .एससी. प्रथम या विद्यार्थ्यांचा मराठी विषयाचा इंडक्शन प्रोग्राम अर्थात उद्‌बोधन वर्ग आयोजित करण्यात आला होता .या अगोदर महाविद्यालयाच्या व विविध वर्गाच्या ग्रुप वर यासंबंधीची सूचना विद्यार्थ्यांना देण्यात आली होती .विद्यार्थ्यांना मराठी भाषेचे आकलन व्हावे. मराठी भाषेतील रोजगाराच्या विविध संधीची माहिती व्हावी .आणि उपयोजन व्हावे. मराठी भाषा ही रोजगार देणारी भाषाआहे यासंबंधीचे विद्यार्थ्यांच्या मनपटलावर नोंद व्हावी आणि यातून विद्यार्थ्यांनी ऊर्जा घेऊन आपल्या आयुष्यात या भाषेचा योग्य वापर करून विविध रोजगार प्राप्त करावेत हा एक सुप्त हेतू या उदबोधन वर्गाच्या पाठीमागे होता. सुरुवातीला या उद्‌बोधन व्याख्यानासाठी कवी व उपक्रमशील शिक्षक महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळाचा पुरस्कार ज्यांना प्राप्त झालेला आहे असे माननीय शिवाजी अंबुलगेकर यांना आमंत्रित करण्याचे ठरले .दिनांक 26 /7 /2025 रोजी वाणिज्य शाखेच्या खोली क्रमांक ०५ मध्ये ११:३० वाजता कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी यशवंत महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे होते .तर प्रमुख पाहुणे म्हणून प्रसिद्ध कवी नाटककार उपक्रमशील शिक्षक माननीय शिवाजी अंबुलगेकर हे होते विचार मंचावर मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय जगताप यांची उपस्थिती होती .कार्यक्रमाच्या सुरुवातीला विद्या पांचाळ या विद्यार्थिनींने स्वागत गीत गावून पाहुण्यांचे यथोचित स्वागत केले. महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे सर यांच्या हस्ते पाहुण्यांचा शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व ग्रंथ भेट देऊन सत्कार करण्यात आला .कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय जगताप यांनी केले. त्यांनी यशवंत महाविद्यालयाच्या मराठी विभागाचे इतिहास आणि वर्तमानात विभागाच्या वतीने आयोजित केलेल्या उपक्रमाचे माहिती विद्यार्थ्यांना दिली विद्यार्थी केंद्री शिक्षण विद्यार्थी केंद्री विभाग आणि सतत कार्यशील राहून विद्यार्थ्यांना अधिकाधिक मार्गदर्शन कसे करता येईल यासाठी मराठी विभाग हा कायम विद्यार्थ्यासोबत असेल असे ते म्हणाले. पाहुण्यांचा परिचय डॉ.शिवाजी सूर्यवंशी यांनी करून दिला प्रमुख पाहुणे शिवाजी अंबुलगेकर यांनी आपल्या मनोगतात रोजगाराभिमुख शिक्षण ही आता काळाची गरज आहे .आणि विद्यार्थ्यांनी रोजगारासाठी मराठी भाषेचा अवलंब आपल्या जीवनात करावा आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये करिअर करावे जेणेकरून उदरनिर्वाहा बरोबरच आपणास आनंदही प्राप्त होईल.असे मत व्यक्त केले.

शिवाजी आंबुलगेकर बोलतानाआपल्या जीवनातील काही महत्त्वाच्या प्रसंगाचा उल्लेख हि विद्यार्थ्यांसमोर केला. विद्यार्थ्यांनी आपले आवडीनुसार विषयाची निवड करावी आणि त्यामध्ये

गुणवत्ता प्राप्त करून आपले करिअर सिद्ध करावे .अशा प्रकारचे योग्य मार्गदर्शन त्यांनी आपल्या एक तासाच्या मनोगतात व्यक्त केले .कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे सरांनी केला त्यांनी मराठी विभागाचे कौतुक केले व यशवंत महाविद्यालयातील स्टार विभाग म्हणून महाविद्यालयात या विभागाची ओळख आहे असे ते म्हणाले सतत कार्यशील आणि तत्पर मराठी विभाग असल्यामुळे त्या विभागात आज हजाराच्या वर विद्यार्थी मराठी विषयाचे शिक्षण घेतात असे गौरवोद्गार त्यांनी याप्रसंगी काढले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन डॉ.विश्वाधार देशमुख यांनी केले तर या कार्यक्रमाची सुरेख असे सूत्रसंचालन अंजली मद्रेवार या विद्यार्थिनींनी केले. कार्यक्रमाला बहुसंख्य विद्यार्थी प्राध्यापक उपस्थित होते










# विद्यार्थ्यांनी आवडीच्या क्षेत्रात करिअर करावे

## शिवाजी अंबुलगेकर यांचे आवाहन

प्रतिनिधी । **नांदेड**

मराठी भाषेचे उपयोजन करून आपल्या जीवनात रोजगाराच्या विविध संधी निर्माण कराव्यात, असे प्रतिपादन प्रसिद्ध वक्ते शिवाजी अंबुलगेकर यांनी केले.

श्री शारदा भवन एज्युकेशन सोसायटी संचलित यशवंत महाविद्यालयात मराठी विभागाच्या वतीने आयोजित पदवी उद्बोधन वर्गाच्या उद्घाटनप्रसंगी उपक्रमशील शिक्षक शिवाजी आंबुलगेकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपप्राचार्य डॉ.हरिश्चंद्र पतंगे हे होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. संजय जगताप यांनी केले.

कवी शिवाजी आंबुलगेकर यांनी आपला भूतकाळ आणि वर्तमान काळ याची सांगड घालत विद्यार्थ्यांशी संवाद साधला. विधायक पद्धतीने मार्गक्रमण करायला लावावे गुरुजनांच्या मार्गदर्शनाखाली आपल्या आवडीच्या क्षेत्रामध्ये आपण करिअर करावे. जेणेकरून आनंदा बरोबर आपल्या उदरनिर्वाह सुद्धा होईल ही भावना व्यक्त केली. कार्यक्रमाचा अध्यक्षीय समारोप उपप्राचार्य डॉ. हरिश्चंद्र पतंगे यांनी केला.